# दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क (मुख्य) परीक्षा-२०१७

## जाहिरात क्रमांक ६०/२०१७

### घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- क या पदाच्या **३००** जागांसाठी दिनांक २४ सप्टेंबर, २०१७ रोजी मुख्य परीक्षा घेण्यात आली आहे. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासनस्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अधीन राहून सदर परीक्षेचा निकाल **दिनांक ८ जानेवारी, २०१८** रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.**सदर परीक्षेमध्ये **सांगली** येथील **श्री. आडमुठे शरदकुमार सुरेश (बैठक क्रमांक-PN००१०४६)** हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **नाशिक** येथील **श्री. धांडे विवेक पंडीतराव (बैठक क्रमांक -PN००४३५१)** तसेच महिला वर्गवारीतून **सांगली** येथील **श्रीमती शिन्दे धनश्री प्रकाश (बैठक क्रमांक-PN००२४९५)** या राज्यातून प्रथम आल्या आहेत.

**३.** या निवड प्रक्रियेच्या पूर्व परीक्षेस २,२९,०६५ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. पूर्व परीक्षेच्या निकाला आधारे पात्र ठरलेल्या ४,३४५ उमेदवार मुख्य परीक्षेसाठी प्रवेशपात्र ठरले होते. प्रस्तुत निकाला आधारे ३०० उमेदवारांची शिफारस केली जाणार आहे.

**४.** गुणवत्ताधारक खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ आणि तद्नंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अद्ययावत शासन निर्णयाधील तरतूदीनुसार त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी नियुक्तीपूर्वी तपासण्याच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे.

**५.** प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ३.८ पहावी)

**दिनांक : ८ जानेवारी, २०१८**
**ठिकाण- मुंबई**

**विजया पडते**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**